महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर   मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे   Rs.2/-   कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ❖ ०३ एप्रिल २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २७५ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेत सादर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : केंद्र सरकारने वक्फ दुरुस्ती विधेयक 2025 बुधवारी (2 एप्रिल 2025) लोकसभेत मांडले. प्रश्नोत्तराच्या तासानंतर दुपारी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्यांक मंत्री किरेन रिजिजू (Kiren Rijiju) यांनी हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी मांडले. या विधेयकावर चर्चेसाठी 8 तासांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. संसदेत विधेयक मांडत असताना विरोधकांकडून प्रचंड गदारोळ झाला. विरोधकांनी चर्चेची वेळ वाढवून 12 तास करण्याची मागणीही केली आहे. दरम्यान, हे विधेयक मांडताना सरकारने देशातील मुस्लिम समुदायाला 5 आश्वासनेही दिली आहेत.

किरेन रिजिजू म्हणाले की, या विधेयकाबाबत 9727772 याचिका आल्या होत्या. आजपर्यंत यापेक्षा जास्त याचिका कोणत्याही विधेयकाबाबत कधीच आलेल्या नाहीत. विविध समित्यांसमोर 284 शिष्टमंडळांनी आपली मते मांडली. सकारात्मक विचाराने या विधेयकाला विरोध करणारेही याला पाठिंबा देतील, असा आमचा विश्वास आहे.




### सरकारने मुस्लिमांना ही 5 आश्वासने दिली

1. संसदेत विधेयक सादर करताना किरेन रिजिजू यांनी मुस्लिमांना आश्वासन दिले की, या विधेयकात कोणत्याही मशिदीवर कारवाई करण्याची तरतूद नाही. हा केवळ मालमत्तेचा मुद्दा आहे, या विधेयकाचा धार्मिक संस्थांशी काहीही संबंध नाही.
2. सरकारने पुढे सांगितले की, वक्फ दुरुस्ती विधेयकात कोणत्याही धार्मिक स्थळ किंवा मशिदीच्या व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्याची तरतूद नाही. यामध्ये कोणताही बदल किंवा हस्तक्षेप होणार नाही.
3. वक्फ दुरुस्ती विधेयकात कोणत्याही धार्मिक कार्यात हस्तक्षेप करण्याची तरतूद नाही. आम्ही कोणत्याही मशिदीच्या कामकाजात हस्तक्षेप करणार नाही. वक्फ बोर्ड कायद्याच्या कक्षेत असेल, त्यात कायद्याच्या विरोधात काहीही केले जाणार नाही.
4. जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा वरचा कोणताही अधिकारी सरकारी जमीन आणि कोणतीही विवादित, जमीन यांच्यातील वादावर लक्ष देईल. वक्फ मालमत्ता निर्माण करताना आम्ही कोणत्याही आदिवासी भागात जाऊ शकत नाही. हा बदल महत्त्वाचा आहे. कोणत्याही मशिदीवर कारवाई करण्याची तरतूद नाही.
5. सरकारने वचन दिले की, केंद्र परिषदेतील एकूण 22 सदस्यांपैकी 4 पेक्षा जास्त गैर-मुस्लिम असू शकत नाहीत. माजी अधिकाऱ्यांसह संसदेचे तीन सदस्य निवडून येणार आहेत. संसद सदस्य कोणत्याही धर्माचे असू शकतात.

### दुसऱ्या कायद्यांना ओव्हरराईड करण्याचा अधिकार

विरोधकांचा संसदेत जोरदार हंगामा होत असताना केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की वक्फ वर वाद 2013 च्या कायद्यानंतर सुरु झाला. या कायद्यामुळे हिंदूस जैन आणि शीखांनाही वक्फ तयार करण्याचा अधिकार मिळाला. परंतू यानंतर कलम 108 आणला गेला. याच कारणाने वक्फला दुसऱ्या कायद्यांना ओव्हरराईड करण्याचा अधिकार मिळाला. रिजिजू यांनी सांगितले की युपीए सरकारद्वारा कायद्यात केलेल्या बदलाने याला अन्य कायद्यांवर पूर्व लक्षी प्रभाव आणला, त्यामुळे या नवीन सुधारणांची आवश्यकता असल्याचे रिजिजू यांनी सांगितले.

### अशा कायद्याला देशात कसे स्वीकारले जाणार ?

दिल्लीत 1978 पासून एक केस चालू होती. दिल्ली वक्फ बोर्डाने सीजीओ कॉमप्लेक्स, संसद भवन... अशा अनेक मालमत्तांवर दिल्ली वक्फ बोर्डाने दावा ठोकला होता. आणि ही वक्फ बोर्डाची संपत्ती असल्याचे म्हटले होते. त्यावेळी सर्व जमिनीला डिनोटिफाय करुन यूपीए सरकारने वक्फ बोर्डाला दिली होती. जर आम्ही सुधारणा विधेयक आणले नसते तर आम्ही ज्या संसद भवनात बसलो आहोत ती संसदेची इमारत डिनोटिफाय केली गेली असती. 123 मालमत्तांना डीनोटीफाय केले होते.

### हा कायदा पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार नाही

केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांच्या या वक्तव्यावर विरोधकांनी जोदरार हंगामा केला आहे. तर रिजिजू यावेळी म्हणाले की मी स्वत:च्या मनातील काही सांगत नाही. सर्वकाही अधिकृत रेकॉर्ड आहेत. मी एक शब्द वरता आपल्या मनाचा बोललेला नाही. जी हकीकत आहे तेच सांगतले आहे. काही लोक CAA च्या वेळी देखील मुसलमानांना भडकवत होते. देशात फिरुन असत्य सांगितले जात होते. परंतु CAA मुळे मुसलमानांची नागरिकता गेलेली नाही. मी अनेक सदस्यांना बोलताना ऐकले आहे की मस्जिदी हिसकावल्या जातील, दर्गा हिसकावतील, परंतू असे काही नाही. आम्ही राज्य सरकाराना अधिकार दिले आहेत. जी प्रॉपर्टी रजिस्टर्ड संपत्ती आहे. ज्याची कागदपत्रे आहेत त्यात कोणताही हस्तक्षेप होणार नाही. हा कायदा पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार नाही असेही केंद्रीय मंत्रि किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केलेले आहे.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या सदस्य निवडीसाठी आज मतदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या सदस्य निवडीसाठी निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांनी दि. १७ जानेवारी २०२५ रोजी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर ९ सदस्यांच्या निवडणुकीसाठी इमारत क्र. ६ व इमारत क्र. ७, डॉ. बिंदा मांजरमकर विद्या प्रसारक मंडळाचे बी.एन. बांदोडकर महाविद्यालय, जननद्वीप, चेंदणी बंदर रोड, ठाणे (प) - ४००६०१ येथे १४ मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. मतदान गुरुवार, दि. ०३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत होणार आहे.

या निवडणुकीसाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे नोंदणीकृत असलेले (R.M.P.) वैद्यकीय व्यवसाय करणारे व मतदार यादीत नाव असलेले मतदार मतदानासाठी मतदान केंद्रावर खालीलपैकी कोणतेही एक छायाचित्र असलेले ओळखपत्र सादर करू शकतात:

१. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दिलेले ओळखपत्र.
२. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दिलेले नोंदणीपत्र (छायाचित्र असलेले).
३. भारत निवडणूक आयोगाने दिलेले मतदार फोटो ओळखपत्र (EPIC).
४. आधार कार्ड (Aadhaar Card).
५. बँक/पोस्ट ऑफिसने जारी केलेले छायाचित्रासह पासबुक (Passbooks with photograph issued by Bank/Post Office).
६. वाहन चालक परवाना (Driving License).
७. पॅन कार्ड (Pan Card).
८. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारे नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड (Smart Card issued by RGI under NPR).
९. भारतीय पासपोर्ट (Indian Passport).
१०. फोटोसह पेन्शन दस्तऐवज (Pension document with photograph).
११. राज्य सरकारने कर्मचाऱ्यांसाठी जारी केलेले सेवा ओळखपत्र (Service identity Cards with photograph issued to employees by State Govt.).
१२. खासदार/आमदारांना जारी केलेले अधिकृत ओळखपत्र (Official identity cards issued to MPs/MLAs/MLCs).
१३. भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र (Unique Disability ID (UDID) Card, M/o Social Justice & Empowerment, Government of India).
१४. भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र (Unique Disability ID (UDID) Card) हे देखील मतदारांसाठी ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरले जाईल.

यापूर्वी जिल्हा निवडणूक शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे (प.) येथे उपलब्ध असलेले खालीलपैकी कोणतेही एक ओळखपत्र मतदानासाठी ग्राह्य धरले जात होते:

* आधार कार्ड, * वाहन चालक परवाना, * बँक पासबुक (छायाचित्रासह), * पॅन कार्ड, * पासपोर्ट
* शासकीय कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, * मालमत्ता कर पावती (मूळ प्रत), * वीज बिल (मूळ प्रत)
* पाणी बिल (मूळ प्रत), * दूरध्वनी बिल (मूळ प्रत),आता या यादीत विशेष विकलांगता प्रमाणपत्राची भर पडली आहे. त्यामुळे, ज्या मतदारांकडे हे प्रमाणपत्र असेल, ते मतदानासाठी त्याचा वापर करू शकतात. मतदानासाठी केंद्र क्रमांकानुसार व्यवस्था खालीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | मतदान केंद्र क्रमांक | ठाणे जिल्ह्याचा अनुक्रमांक | एकूण मतदार |

| 1 | 1 | 1 ते 800 | 800 |,| 2 | 2 | 801 ते 1600 | 800 |,| 3 | 3 | 1601 ते 2400 | 800 |,| 4 | 4 | 2401 ते 3200 | 800 |,| 5 | 5 | 3201 ते 4000 | 800 |, | 6 | 6 | 4001 ते 4800 | 800 |,| 7 | 7 | 4801 ते 5400 | 800 |,| 8 | 8 | 5401 ते 6400 | 800 |,| 9 | 9 | 6401 ते 7200 | 800 |,| 10 | 10 | 7201 ते 8000 | 800 |,| 11 | 11 | 8001 ते 8800 | 800 |,| 12 | 12 | 8801 ते 9600 | 800 |,| 13 | 13 | 9601 ते 10400 | 800 |,| 14 | 14 | 10401 ते 10905 | 505 |

अधिक माहितीसाठी जिल्हा निवडणूक शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे (प.) - ४००६०१, दूरध्वनी क्र.: ०२२-२५४५४१४२ | ई-मेल: dydeothane@gmail.com येथे संपर्क साधावा, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीम.वैशाली माने यांनी केले आहे.

# अंबरनाथमध्ये लवकरच झिरो कॅश काउंटर हॉस्पिटल सुरु होणार : डॉ. श्रीकांत शिंदे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथमध्ये लवकरच उल्हासनगर प्रमाणे झिरो कॅश काऊंटर हॉस्पिटल देखील सुरू करण्याबाबत कायदेशीर बाबी पूर्ण करण्यासंदर्भात मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांना सूचना दिल्याचे खासदार शिंदे यांनी सांगितले.

अंबरनाथ नगरपरिषदेच्या माध्यमातून माजी नगरसेवक सुभाष साळुंखे यांच्या विशेष प्रयत्नाने शिवाजीनगर पोलीस ठाण्यासमोरील गावदेवी मैदानाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. त्यातील गावदेवी मैदान येथे संगीत व प्रकाशमय जॉगिंग ट्रॅक, छत्रपती संभाजी महाराज व्यायामशाळा, सावित्रीबाई फुले महिला स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र, राष्ट्रमाता जिजाऊ बलोद्यान आदींचे लोकार्पण तसेच राष्ट्रमाता जिजाऊ व बाल शिवाजी राजे यांच्या शिल्पाचे अनावरण खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना डॉ. श्रीकांत शिंदे यांनी अंबरनाथमध्ये लवकरच उल्हासनगर प्रमाणे झिरो कॅश काऊंटर हॉस्पिटल सुरू करण्यात येणार असल्याबाबत माहिती दिली. याप्रसंगी आमदार डॉ बालाजी किणीकर, मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड, माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी, अब्दुलभाई शेख, संवाद फाउंडेशनच्या सुवर्णा साळुंखे आदी उपस्थित होते.

# ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केली उल्हास नदीची पाहणी

## जलपर्णी बाबत ठोस उपाय योजना करण्याचे आश्वासन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाणे जिल्हा परिषदेचे डॅशिंग, कर्तव्यनिष्ठ, कार्यतत्पर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रोहन घुगे यांनी अंबरनाथ, कल्याण पाहणी दौऱ्यात उल्हासनदीतील जलपर्णीची पाहणी केली, यावेळी याची व्यापकता पाहता ग्रामपंचायतींनी प्रस्ताव पाठवावे ते प्रस्ताव शासनास पाठविण्यात येणार असल्याचे श्री रोहन घुगे यांनी सांगितले, यासह त्यांनी मेमोरिडिंग साठी अंबरनाथ पंचायत समिती ला भेट दिली, व आढावा घेतला. नेवाळी ग्रामपंचायतीला भेट देऊन घनकचरा व्यवस्थापन बाबत चर्चा केली, घरकुल योजनेतील घरांची पाहणी केली.महाराष्ट्रातील नद्याने प्रदूषण वाढत आहे. त्यात उल्हास नदी आघाडीवर आहे. या बाबत उल्हास नदीचे नदीपात्र जलपर्णीने भरले असल्याने मासे व इतर जलचर यांचे जीवन धोक्यात आले आहेत. याबाबत दैनिक ठाणे जीवनदीप व पत्रकार संजय कांबळे यांनी इलेक्ट्रॉनिक्स मिडिया व विविध वृत्तपत्रातून प्रसिद्ध केली होती.



यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी संजय कांबळे यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली.


याची दखल ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रोहन घुगे यांनी घेतली, तात्काळ त्यांनी म्हारळ, वरप, कांबा येथे भेट देऊन उल्हास नदीतील जलपर्णीची पाहणी केली, यावेळी त्यांच्या समवेत अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) प्रमोद काळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत), कल्याण चे तहसीलदार, सचिन शेजाळ, म्हारळ ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीम निलिमा म्हात्रे, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, विस्तार अधिकारी श्री भोसले, ग्रामपंचायत अधिकारी अमोल मुरबाडे, आदी मंडळी उपस्थित होते. उल्हास नदीपात्रातील जलपर्णी पाहता हे काम किती व्यापक व खर्चिक असल्याने ते ग्रामपंचायतीच्या आवाक्याबाहेर असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यामुळे याबाबत प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना ग्रामपंचायतीना देण्यात आल्या, भविष्यात उल्हास नदी शुध्दीकरणाबाबत येथील नागरिकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# बदल्यांचा धडाका सुरूच

## सात IAS अधिकाऱ्यांच्या बदल्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरूच आहे. गेल्याच आठवड्यात पाच अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतर मंगळवारी पुन्हा सात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले आहेत. राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होऊन 4 महिन्यांहून अधिक कालावधी होऊन गेला आहे, तरी देखील प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश थांबण्याचे नाव घेत नाही. काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 6 IAS



अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारनं मंगळवारी (ता.1 एप्रिल) पुन्हा एकदा सात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये भारत बास्टेवाड यांची नागपूरमध्ये रोजगार हमी योजनेच्या ठिकाणी बदली करण्यात आली आहे. तर लक्ष्मी नारायण मिश्रा यांची एमएसआरडीसीमध्ये सहाय्यक व्यवस्थापकपदी बदली करण्यात आली आहे. तर वरिष्ठ आयएएस अधिकारी निधी पांडे यांची लघुउद्योग खात्याच्या व्यवस्थापक संचालकपदी बदली करण्यात आली आहे. आमच्याबद्दल मदत तसेच रुसा प्रकल्प संचालक राजेंद्र भारुड यांची मुंबईतील उद्योग संचलनालयात अतिरिक्त विकास आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. डॉ. राजेंद्र भारुड यांची फेब्रुवारी महिन्यात TRTI च्या आयुक्तपदावरून रुसामध्ये प्रकल्प संचालक म्हणून बदली करण्यात आली होती. त्यानंतर काहीच दिवसांमध्ये त्यांची पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. त्यांच्याकडे उद्योग विभागाच्या अतिरिक्त विकास आयुक्तपदाचा कार्यभार देण्यात आला आहे.


### बदली झालेले अधिकारी पुढीलप्रमाणे :

1. इंदुराणी जाखड - पालघर जिल्हाधिकारी 2 - वैष्णवी बी - अतिरिक्त आयुक्त, नागपूर मनपा 3. भारत बास्टेवाड - रोजगार हमी योजना, नागपूर 4. राजेंद्र भारूड - अतिरिक्त विकास आयुक्त, उद्योग 5. नेहा भोसले - रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी 6. लक्ष्मी नारायण मिश्रा जॉईन्ट एमडी, एमएसआरडीसी 7. निधी पांडे - व्यवस्थापक संचालक, लघुउद्योग



# वाहनांवर नियंत्रण आणायला हवे

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुणेकरांनी जोरदार वाहनांची खरेदी केल्याचे समोर आले आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी १० हजार १७० वाहनांची खरेदी केली. त्यात ६५१० दुचाकी, २४२४ चारचाकी, ५१७ गुड्स , २८३ रिक्षा, ६८ बस, २३४ टॅक्सी, १३४ अन्य वाहने पुणेकरांनी खरेदी केल्याची नोंद आरटीओत करण्यात आली. मागील वर्षापेक्षा या वर्षी वाहन खरेदीची संख्या तीन हजाराने अधिक आहे. मागच्या वर्षी याच काळात ७३३६ वाहनांची नोंद झाली होती याचाच अर्थ मागील वर्षी पेक्षा यावर्षी अधिक वाहनांची खरेदी पुणेकरांनी केली. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या दहा हजार वाहनांची भार पडली आहे. केवळ पुणे शहरातच एका दिवशी दहा हजारांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची बाब समोर आली आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे पाच हजार वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्यामुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्यामुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.




लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जनजागृती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्व येथील लोकग्राम विरंगुळा केंद्रात सोमवारी महा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रियांचे मानसिक आरोग्य या विषयावर कल्याण शाखा तर्फे आयोजन केले होते.

महिला विभाग सहभाग कार्यवाह ज्योती मेश्राम यांनी लोकग्राम योगा ग्रुप साठी हे आयोजन केले होते.स्त्रियांचे मानसिक आरोग्य या विषयावर व्यक्त होण्या करीता डॉ.सुषमा बसवंत व ॲड. आरती चाकोले निमंत्रित होत्या. अंनिस चे जिल्हा बुवाबाजी संघर्ष विभागचे हनुमंत देडगे, कल्याण शाखेच्या साथी संगीता भालेराव उपस्थित होते. तसेच लोकग्राम पूर्व योगा ग्रुपच्या 25 महिला उपस्थित होत्या.



अंनिसच्या कार्यकर्त्यांचे स्वागत योग ग्रुपच्या महिलांद्वारे करण्यात आले. अंनिसच्या जिल्हा महिला विभाग कार्यवाह प्रज्ञा चव्हाण यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व अंनिसच्या कार्यप्रणालीबाबत, अंनिस काय काय करते, अंनिसने काय काय केले याबाबत माहिती दिली. तसेच अरुण सोनवणे यांनी स्त्रियांच्या समुपदेशन बाबत उपस्थिताना मार्गदर्शन केले. जिल्हा कायदा विभाग कार्यवाह ॲड आरती यांनी महिलांचे कामाच्या ठिकाणी, पाळीच्या काळामध्ये, आणि रोजच्या जीवनामध्ये स्त्रियांचे वारंवार मूड स्विंग होणे, चिडचिड होणे, चंचलता वाढणे, मानसिक ताण तणाव याबाबत माहिती दिली. तसेच असे जर वारंवार होत असेल तर तज्ज्ञांशी सल्लामसलत घेण्यास सुचविले. मानसिक ताण साचवून न ठेवता जवळच्या विश्वासू व्यक्तींशी बोलून दाखवावे असे सांगितले.

त्यानंतर अंनिस ठाणे जिल्हा कार्याध्यक्षा डॉ.सुषमा बसवंत यांनी आरोग्य म्हणजे काय? निरोगी मानसिकता म्हणजे काय हे महिलांना सांगितले व त्या वरील उपाय सांगितले. डिप्रेशन चे प्रकार सांगितले 1 वयात येताना,2डिलीव्हरी अगोदर व नंतर चे मूड, 3पाळी जाताना,4 चिंतारोग,5 पी टी एस डी, तसेच अंगात का येते हे सांगितले. हिस्टेरिया, तसेच असे आजार होऊ नये म्हणून काय काळजी घ्यावी आणि झाल्यास काय करावे याबाबत मार्गदर्शन केले.

# सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी
## आ. निरंजन डावखरे यांना निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** अखिल रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघतील सभासदांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी पदवीधर शिक्षक आमदार निरंजन डावखरे यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

सदर निवेदनात म्हटले आहे की ३१/१२/१९६७ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या निवड श्रेणी बाबत तसेच १९६७ नंतर सेवेत लागलेल्या प्राथमिक शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ मिळणेबाबत रायगड शिक्षणाधिकारी यांना १/१२/२०२३चे पत्र ५/१/२०२४चे उपसचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र.तसेच मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांना उपदान व अंशराशीकरणाची रक्कम मिळवी. गटविमा २०२१ पासूनचे सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे प्रस्ताव गटाकडे परत केल्याबाबत. भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानाचे प्रस्ताव वर्ष होऊन मंजूर न होणे बाबत. अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना ड्रिम ट्रेंड समजून सेवा निवृत्तीचे लाभ देणेबाबतचे १५/५/२०२४ च्या पत्र. सेवानिवृत्त प्राथमिक विषय शिक्षकांना पदवीधर वेतन श्रेणी मंजूर करणेबाबत. आदि प्रश्न असून सेवा निवृत्त प्राथमिक शिक्षकांचे वरील प्रश्न लवकरात लवकर निकाली काढावेत अशी मागणी संघटनेच्या वतीने जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील आणि सरचिटणीस गुरुनाथ पाटील यांनी केली आहे.

### कनार्ळा अभयारण्यातील
# लोखंडी पत्र्याची चोरी करणारे त्रिकुट जेरबंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** कर्नाळा अभयारण्यात प्राण्यांच्या संरक्षणासाठी लावलेले लोखंडी पत्रे चोरण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. एजाज अहमद मोमीन आलम शेख (वय २६, रा. कोन, मुळ रा. उत्तरप्रदेश), रोजअली मुसताक खान (वय २२, रा. पळस्पे), रईस सलारु खान (वय ३७, रा. पळस्पे) या तिघांना कोन गाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे.



माकड आणि इतर प्राणी रस्त्यावर येवू नये म्हणून या प्राण्यांच्या संरक्षणासाठी कर्नाळा अभयारण्य परिसरात उंच लोखंडी पत्रे बॉक्स लावण्यात आले आहेत. कर्नाळा अभयारण्य येथे प्राण्यांच्या संरक्षणासाठी लावलेले लोखंडी पत्रे (बॉक्स) चोरुन ते पळवून नेताना टेम्पो जागरुक वाहन चालकांनी पकडला. यावेळी चोर जंगलातील दाट अंधाराचा फायदा घेत संरक्षण भिंतीवरुन उडी मारुन जंगलात पळून गेले होते. या प्रकाराची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत टेम्पो ताब्यात घेतला. चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर यातील तीनही आरोपींना ताब्यात घेतले.

# छाया साळवे यांची उदयोग क्षेत्राकडे वाटचाल
## टेलरिंग व कटलरी शॉपचे मुरबाड मध्ये उदघाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील समाजसेवक, अन्याय आत्याचर निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष आणि भाजपा अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष, समाजभूषण आण्णा साळवे यांच्या सहचारीनी सौ. छाया आण्णा साळवे यांनी व्यावसायिक दृष्ट्या विचार करुन आपल्या संसाराला हातभार लागावा. म्हणून मुरबाड मध्ये शिवण क्लास प्रशिक्षण घेऊन, पूर्ण करुन आज मुरबाड नगरपंचायत, न्यू इंग्लिश स्कुल समोर पहिल्या मजल्यावर छाया लेडीज टेलर व कटलरी शॉप नावाने दुकान उघडून आपल्या व्यवसायाला सुरवात केली. या शॉपचे उदघाटन समाज सेविका संगीताताई कमलाकर घोलप व डी वाय फाऊंडेशन च्या जिल्हाध्यक्षा चारुशीला काळुराम गायकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

यावेळी मुरबाड नगर पंचायतीचे नगराध्यक्ष संतोष चौधरी, रिपाई ठाणे सरचिटणीस प्रा. शरदचंद्र सोनावणे, रिपाई सेक्युलर जिल्हाध्यक्ष रविंद्र चंदणे,वंचित बहुजन आघाडीचे तालूका अध्यक्ष गुरुनाथ पवार, भीमाई सामाजिक संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब रातांबे, सामाजिक कार्यकर्ते कमलाकर घोलप, रिपाई शहर अध्यक्ष कैलास देसले,रिपाई सेक्युलर युवक अध्यक्ष राजेश गायकवाड, उद्योजक संजय उबाळे, जेष्ठ पत्रकार प्रकाश जाधव,लोकक्रांती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेश मोरे,माहिती अधिकारी कार्यकर्ते व पत्रकार दिलीप पवार, सामाजिक कार्यकर्ते दिलीप धनगर,मराठी मुंबई पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष शंकर करडे, मुरबाड समाचारचे पत्रकार संजयजी बोरगे, डी वाय फाऊंडेशन तालूका अध्यक्ष तानाजी घागस, रिपाई सरचिटणीस भूपेश साटपे, पँथर बंटी साटपे ,महेश साटपे, ॲड निखील आहिरे, प्रकाश पंडित,जितेंद्र पंडित,पत्रकार जगन गायकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष विलास जाधव, यांच्यासह मुरबाड तालुक्यातील असंख्य महिला पुरुष कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून छाया साळवे यांनी सुरु केलेल्या छोटेखाणी व्यवसायला,कर्तृत्वाला आणि जिद्दीला दाद देत शुभेच्छा दिल्या.

# नातवंडे व सूनेकडून वृद्ध आजोबांना बेदम मारहाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणच्या जय मल्हार नगरमध्ये एक हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. ७५ वर्षीय शिवकुमार त्रिवेदी यांना त्यांच्या नातवंडांनी आणि सूनेने अमानुषपणे मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या शिवकुमार यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, एवढ्या गंभीर प्रकरणातही पोलिसांनी फक्त एनसी दाखल करून थातूरमातूर कारवाई केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.



**होळीच्या दिवशी मारहाणीचा प्रकार** - १४ मार्च रोजी संध्याकाळी होळीच्या निमित्ताने शिवकुमार यांचा धाकटा मुलगा सर्व्हेश त्रिवेदी त्यांना भेटण्यासाठी गेला होता. त्याने वडिलांचे आशीर्वाद घेतले आणि घरी निघून गेला. मात्र, यावरून घरातच वादंग निर्माण झाले. शिवकुमार यांना त्यांचा नातू सुशील, नात शांती आणि सून उषा यांनी संतप्त होत शिवीगाळ करत मारहाण केली. या हल्ल्यात त्यांना डोक्याला गंभीर इजा झाली. विशेष म्हणजे, मोठा मुलगा राजेश त्रिवेदी हे सगळं पाहत होते, तरीही त्यांनी आपल्या कुटुंबीयांना थांबवण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. इतकंच नव्हे, तर जखमी अवस्थेत असलेल्या वृद्ध शिवकुमार यांना घरात कोंडून ठेवण्यात आलं.

रक्तबंबाळ अवस्थेत सुटका, पण पोलिसांचा हलगर्जीपणा १५ मार्चला दुपारी कशीबशी सुटका करून घेत शिवकुमार यांनी आपल्या धाकट्या मुलाला फोन करून सर्व प्रकार सांगितला. यानंतर सर्व्हेश यांनी आपल्या पत्नीला, रंजनाला, वडिलांना मदत करण्यासाठी पाठवले. मात्र, पोलिसांनी या प्रकरणात फक्त एनसी नोंदवून जबाबदारी झटकली.

यानंतर, शिवकुमार आणि त्यांची सून रंजना जेव्हा त्यांच्या बॅगेसाठी मोठ्या मुलाच्या घरी गेले, तेव्हा आणखी एक हिंसक प्रकार घडला. राजेश त्रिवेदीने रंजनावर धावून जात तिच्यावर हल्ला केला. त्याच्या मुलीने दांडक्याने मारहाण केली, मुलाने तिला उचलून आपटलं, तर पत्नीने केस ओढत मारहाण केली. यावेळी रंजनाचा मोबाईल फोडण्यात आला आणि गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेतल्याचा आरोप आहे. चार दिवस अतिदक्षता विभागात, पण न्याय अद्यापही नाही. या घटनेनंतर शिवकुमार यांना गंभीर अवस्थेत मिरा रुग्णालयात दाखल करण्यात आलं, जिथे चार दिवस अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. एवढ्या गंभीर हल्ल्यानंतरही पोलिसांनी केवळ दोन्ही बाजूंच्या एनसी नोंदवून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शिवकुमार आणि त्यांचा धाकटा मुलगा सर्व्हेश करत आहेत. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, वृद्धांवरील अत्याचाराचा हा प्रकार तातडीने गांभीर्याने घेतला जावा, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. आता पोलिस या प्रकरणात योग्य कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गीतासार



### अध्याय ६
## आत्मसंयमयोगः

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् । उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ ६-२७ ॥

कारण ज्याचे मन पूर्ण शांत आहे, जो पापरहित आहे आणि ज्याचा रजोगुण शांत झालेला आहे, अशा या सच्चिदानंदघन ब्रह्माशी ऐक्य पावलेल्या योग्याला उत्तम आनंद मिळतो. ॥ ६-२७ ॥

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः । सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ॥ ६-२८ ॥

तो निष्पाप योगी अशा प्रकारे सतत आत्म्याला परमात्म्याशी जोडून सहजपणे परब्रह्म परमात्म्याच्या प्राप्तीच्या अपार आनंदाचा अनुभव घेतो. ॥ ६-२८ ॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि । ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ ६-२९ ॥

ज्याचा आत्मा सर्वव्यापी अनंत चैतन्यात ऐक्यस्थितिरूप योगाने युक्त असून जो सर्वांना समभावाने पाहणारा आहे, असा योगी आत्मा सर्व सजीवमात्रात स्थित व सजीवमात्र आत्म्यात कल्पिलेले पाहातो. ॥ ६-२९ ॥

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति । तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ६-३० ॥

जो पुरुष सर्व सजीवांमध्ये सर्वांचा आत्मा असलेल्या मला वासुदेवालाच व्यापक असलेला पाहतो आणि सर्व सजीवांना मज वासुदेवात पाहतो, त्याला मी अदृश्य असत नाही आणि मला तो अदृश्य असत नाही. ॥ ६-३० ॥

# रेसिपी
## मसाला कॉर्न पॉकेट



**साहित्य**

1 मक्याच्या कणसाचे दाणे,1 कांदा बारीक चिरुन,1 टीस्पून आलेलसूण पेस्ट,1 टीस्पून तिखट किंवा आवडीप्रमाणे,1/2 टीस्पून हळद,1/2 टीस्पून धणेपूड,1/2 टीस्पून गरम मसाला,चवीनुसार मीठ,थोडी कोथिंबीर बारीक चिरुन,1 लिंबाचा रस,2 मेझरींग कप मैदा कव्हर साठी,1 टीस्पून ओवा,चवीनुसार मीठ,1/4 कप तेल मोहन,1 टीस्पून जीरे फोडणीकरीता,1 टीस्पून मोहरी,तळणासाठी तेल , आवश्यकतेनुसार पाणी

**कृती**

प्रथम आपण कव्हर म्हणजे पॉकेट करण्यासाठी मैदा भिजवून घेऊ. मैदा चाळून घेऊन त्यात मीठ, ओवा हातावर चोळून टाका, मिक्स करुन घ्यावे, नंतर तेल टाकून मैद्याला चांगले चोळून घ्यावे. 2-3 मिनीट. नंतर थोडे थोडे पाणी टाकून कडक भिजवून घ्यावे.व 20 मिनीट झाकून ठेवावे.आता सारण करुया. मक्याचे दाणे किंचित वाफवून घ्यावे.व जाडसर बारीक करावे. शक्यतोवर मिक्सर वापरु नये. कारण त्याची पेस्ट होते.त्यानंतर कढईमध्ये 1 टेबलस्पून तेल टाकून जिरेमोहरी टाकून तडतडल्यावर कांदा, आलेलसूण पेस्ट टाकून परतावे. एक मिनीटाने त्यात हळद, तिखट धणेपूड मसाला व मीठ टाकून चांगले एकत्र करावे.नंतर बारीक केलेले मक्याचे दाणे घालावे. 2-4 मिनीट झाकून वाफ येऊ द्यावी.आता त्यात लिंबाचा रस आणि कोथिंबीर घालून छान मिक्स करावे. आवडत असल्यास 1/2 टीस्पून साखर घालावी. सारण तयार झालेय.आता भिजवलेला मैदा पुन्हा एकदा चांगला मळून घ्यावा. त्याचे मोठ्या पेढ्याएवढे गोळे करुन घ्यावे. नंतर एक गोळा घेवून पोळीच्या जाडीची पोळी लाटून घ्यावी. त्यावर मध्ये सारण घालावे. आणि पोळीची चौकोनी घडी घालून पॉकेट तयार करावे. याप्रमाणे सर्व पाॅकेट तयार करेपर्यंत कढईत तेल गरम करायला ठेवावे. तेल चांगले गरम झाले की त्यात तयार पॉकेट सोडावे. आणि मध्यम सोनेरी रंग येईपर्यंत तळावे. अशाप्रकारे सर्व तळून घ्यावे.आपले मसाला कॉर्न पॉकेट तयार आहेत.

### वाचक मनोगत
# अत्यावश्यक औषधांच्या किमती परवडणाऱ्या हव्यात !

नियमित, दीर्घकाळ घेतल्या जाणाऱ्या आणि जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अशा 900 हून अधिक औषधांच्या किंमतीत नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी वाढ झाल्याने सामान्य, मध्यमवर्गीय आणि ज्येष्ठ मंडळींच्या चिंतेतही त्याच्या दुप्पट वाढ झाली असं म्हटल्यास ते खोटे ठरू नये. खरंतर शासनाकडून, संबंधित यंत्रणांनी अशा अत्यावश्यक, दीर्घकालीन घ्याव्या लागणाऱ्या औषधांच्या किमती नियंत्रणात ठेवण्याचा दृष्टिकोन, प्रयत्न करावयास हवा तरच ज्येष्ठांसह, सर्वसामान्य मध्यमवर्गीय यांना दिलासा मिळेल, जगण्याची उमेद वाढेल.

\- विश्वनाथ पंडित, ठाणे

# नांदगाव फाटा ते पाडाळे मिल्हे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तहसीलदारांचे आदेश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील नांदगाव फाटा ते पाडाळे मिल्हे या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर प्रशासकीय पातळीवर गती मिळाली आहे. आज तहसीलदार कार्यालयात यासंदर्भात महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. तहसीलदार अभिजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी कैलास पंतगीराव आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. बैठकीत उपस्थितांनी या रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधले. विशेषतः २०२१-२२ मध्ये झालेल्या कामांमध्ये अनियमितता आणि बोगस काम झाले असल्याचा मुद्दा नागरिकांनी जोर धरला. या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. तहसीलदार अभिजित देशमुख यांनी नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाला नवीन मंजूर रस्त्याचे काम सुरू होत नाही तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्याचे आदेश तहसीलदारांनी दिले आहेत. यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. या बैठकीला नांदगाव फाटा ते पाडाळे परिसरातील ज्ञानेश्वर मुरबाडे, कृष्णकांत मलिक , सुनील आलम, धनाजी मुरबाडे, संतोष मुरबाडे, गजानन दळवी, गजानन मुरबाडे, डोंगरे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेचे नागरिकांनी स्वागत केले आहे. या बैठकीमुळे नांदगाव फाटा ते पाडाळे या भागातील नागरिकांची अनेक दिवसांपासूनची मागणी पूर्ण होण्याची आशा निर्माण झाली आहे. रस्त्याचे काम वेळेत आणि दर्जेदार व्हावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची पालघर जिल्हाधिकारी पदी बदली

## केडीएमसीच्या प्रभारी आयुक्त पदाचा कारभार अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्याकडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदी बदली करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी काढले आहेत. डॉ . इंदुराणी जाखड यांची नोव्हेंबर २०२३ रोजी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आयुक्त पदी नियुक्ती करण्यात आली होती. या महापालिकेतील पहिल्या महिला आयुक्त होत्या.

त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी महिला बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभागाकडे लक्ष देऊन कायापालट करण्याचा निर्णय घेत विकास कामांना गती दिली. सँटीस ,प्रश्न, रिंग रूट ,बाधितांचे पुनर्वसन प्रश्न याबाबत त्या नेहमीच बैठका घेऊन आढावा घेत प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. कल्याण डोंबिवली शहराचा मुलभूत पायाभूत सुविधा विकास कामाचा समन्वय साधत विकासला गती देत होत्या. त्यांच्या कालावधीत मनपा शाळा,उघाने, स्माशनभूमी कात टाकण्याचे काम सुरू होते. नौदल संग्रालयाच्या आरमाराच्या कामाबाबत त्या जातीने लक्ष देऊन काम पूर्ण होण्याबाबत दक्ष होत्या.




प्रसंगी कठोर ,संयमी आणि ठोस निर्यण घेण्याच्या कार्यकुशलतेमुळे, आधिकारी, कर्मचारी वर्गात त्यांचा दबदबा होता. अशा कार्यशम आयुक्त सर्वसामान्याचे तक्रारी जनता दरबाराच्या माध्यमातून मार्गी लावत लोक प्रिय झाल्याचे जनता दरबारातील होणारी गर्दी पाहता दिसून येत होते. त्यांच्या या बदलीने चांगल्या कार्यक्षम आयुक्तांची इतका लवकर बदली व्हायला हवी नव्हती अशा चर्चा सर्वसामान्य वर्गात रंगल्या होत्या.

कल्याण डोंबिवली मनपाच्या प्रभारी आयुक्त पदाचा कारभार अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या कडे सोपविण्यात आला आहे.

### जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत

# जात वैधता प्रमाणपत्र विशेष मोहिमेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे यांच्यामार्फत समता पंधरवडा निमित्त जात प्रमाणपत्र पडताळणी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

अर्जदार/विद्यार्थी यांना जात वैधता प्रमाणपत्राची कार्यपध्दती व जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारे कागदोपत्री पुराव्यांबाबत जागृकता/ माहिती नसल्याने व विहित कालावधीमध्ये संबंधित समितीकडे अर्ज सादर न केल्यामुळे मागासवर्गीय व्यक्तीस शिक्षण, सेवा, निवडणूक व इतर संविधानिक आरक्षणाच्या लाभापासून वंचित रहावे लागते.

यास्तव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे या कार्यालयाच्या वतीने समता पंधरवड्याचे औचित्य साधून दि.4 एप्रिल 2025 रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी ज्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी करण्याकरिता जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे कार्यालयात अर्ज केले आहेत व त्यांना त्रुटीची पुर्तता करण्याबाबत समिती मार्फत दूरध्वनी, SMS व त्रुटीची पत्रे प्राप्त झालेली आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी दि.4 एप्रिल 2025 रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा मजला, दत्तवाडी बस स्टॉप जवळ, खारेगांव, कळवा, ठाणे येथे त्रुटी पुर्ततेसह सकाळी 11.00 वाजता उपस्थित राहावे, असे अवाहन संशोधन अधिकारी तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य सचिव प्रसाद खैरनार यांनी केले आहे.

# आम्हाला शिकवू द्या हो.....ऽ ऽ

## ■ शिक्षक करतात दिड शतकी अशैक्षणिक कामे

## ■ अध्यापनावर होतो विपरीत परिणाम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूशन ज्यामध्ये नगरपालिका, महानगरपालिका,जिल्हा परिषद, खाजगी संस्था इत्यादी शैक्षणिक संस्था येतात.या संस्थांमधील शिक्षकांच्या समस्या,अडचणी आणि प्रश्न या संदर्भात शिक्षक हतबल झाले असून, "आता आम्हाला शिकवू द्याहो" अशी केविलवाणी विनवणी शासनाकडे करतांना दिसत आहेत.तर विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी महाराष्ट्रातील शिक्षक कटिबद्ध आहेत.परंतु शासन सकारात्मक असल्याचे दिसत नाही असे सांगत महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शाळा म्हणजे विविध उपक्रमांच्या प्रयोगशाळा झाल्या असल्याची उदविग्नता ठाणे जिल्हा शिक्षक सेनेचे अध्यक्ष प्रमोद भाऊ पाटोळे यांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलतांना व्यक्त केली.

अनेकदा शिक्षक आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरतांना दिसत असताना शासनाने आणि प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही.शिक्षकांच्या प्रश्नाबाबत शासन पूर्णतः उदासीन असून विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी महाराष्ट्रातील शिक्षक कटिबद्ध आहेत.असंख्य खाजगी संस्था शासनाच्या मदतीने विविध उपक्रम शाळांमध्ये राबवून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून विद्यार्थ्यांना दूर नेले जात असल्याचे श्री. पाटोळे यांनी बोलून दाखवले..



शिक्षकांना तब्बल १६१ प्रकारची अशैक्षणिक कामे करावी लागत असून या अशैक्षणिक कामांचा अध्यापनावर विपरीत परिणाम होऊन शैक्षणिक दर्जा घसरत आहे.परिणामी महाराष्ट्रामध्ये शिक्षकांची ३० टक्के पदे रिक्त असल्याचे श्री.पाटोळे यांनी सांगितले.तसेच दररोज नवनवीन उपक्रमांचे परिपत्रक काढून उपक्रमांच्या भडीमारामुळे आज स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक पुरता हतबल झाला आहे. शिवाय शाळेत शिपाई व लिपिक नसल्याने शाळा उघडण्यापासून बंद करेपर्यंत सर्व जबाबदारी शिक्षकांनाच पार पाडावी लागते. त्यातच मुख्यालयी राहत असल्याबाबत ग्रामसभेचा ठराव बंधनकारक असल्याचा फतवा काढून ग्रामविकास विभागाने शिक्षकांची अगदी मानगुटच धरली आहे.पूर्वी प्रवासाची साधने नव्हती तेव्हा मुख्यालयी राहणे आवश्यक होते. मात्र आता शिक्षक आपल्या स्वतःच्या वाहनाने शाळेत पोहोचू शकतात.परंतु १९ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयामुळे शिक्षकांच्या घरभाडे भत्त्याच्या मुद्द्याला हात घालून संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षकांना भीती घातली जात असल्याचा आरोप करुन हा जाचक निर्णय रद्द करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

मध्यान्ह भोजन योजनेचा शाळा प्रमुखांवर प्रचंड ताण येत आहे. ऑनलाइन अॅपवर दररोज माहिती भरावी लागते.तरीही मुख्याध्यापकांना मिलीग्राम मध्ये धान्याचा ऑफलाईन हिशोब ठेवावा लागतो.एकूण दहा प्रकारच्या नोंदी नियमित कराव्या लागतात. आता तर पोषण आहारात गोड खिचडी देण्यासाठी शिक्षकांनी गाव पातळीवर फिरून व्यवस्था करावी असे परिपत्रक शासनाने काढले असल्याचे पाटोळे यांनी सांगितले. शिवाय मागील तारखेची नोंदणी बंद केल्याने शिक्षकांचे हजारो रुपयांचे नुकसान होत आहे. महाराष्ट्रातील शाळा डिजिटल झाल्या. मात्र शिक्षकांना आपल्या खिशातून शाळेचे विद्युत बिल भरावे लागते. कारण शाळेचे विद्युत बिल भरण्याची कोणतीही तरतूद शासनाने आजपर्यंत केलेली नाही.शिवाय शाळांची वीज ही व्यवसायिक दराने आकारली जाते. त्यामुळे विजेअभावी शाळेतील सर्व डिजिटल साधने आता बंद पडत आहेत.तथापी शिक्षकांच्या पदोन्नती बाबत पूर्णतः उदासीनता दिसून येत आहे.पदोन्नती संदर्भात राज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकवाक्यता नाही.प्रत्येक जिल्हा परिषद किंवा पालिका स्तरावर वेगवेगळी पद्धती अवलंबली जात आहे. त्यामुळे शिक्षकांना पदोन्नतीच्या अतिशय कमी संधी उपलब्ध होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

**शिक्षकांना पदोन्नत होण्याची संधी मिळत नाही.मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी या पदोन्नतीबाबत १ जानेवारी ही दिनांक लक्षात घेऊन दरवर्षी रिक्त पदे पदोन्नतीने एकाच वेळी भरणे आवश्यक आहे असे आमचे मत आहे.परिणामी शिक्षक हे विद्यार्थी गुणवत्तेसाठी कटिबद्ध आहेत.परंतु त्यांच्या डोक्यावरील उपक्रमाचे ओझे कमी करून आम्हाला फक्त विद्यार्थ्यांना शिकवू द्या एवढीच आमची अपेक्षा आहे.**

**– प्रमोद पाटोळे,जिल्हाध्यक्ष शिक्षक सेना.**

### विद्यार्थी गुणवत्ता दडपली उपक्रमांच्या ओझ्याखाली

**शिक्षकांना निवडणूक संदर्भातील १० कामे. बांधकाम संदर्भातील ५ कामे,शाळा स्तरावरील ८ सर्वेक्षण, विविध समित्यांच्या १६ कामकाजांची पाहणी,शालेय पोषण आहाराचे १० लेखे व दस्तऐवज अद्यावत ठेवणे, आरोग्याशी संबंधित १० लेखे, शिष्यवृत्ती संदर्भात १६,सर्व शिक्षा अभियान खर्चाचे १० लेखे ठेवणे,ऑनलाईन कामे त्याचप्रमाणे माझी शाळा सुंदर शाळा, मेरी माटी मेरा देश,आनंददायी शनिवार, दप्तराविना शाळा, समता सप्ताह, मराठी भाषा संवर्धन सप्ताह, सूर्यनमस्कार,योग दिन,शालेय शिक्षण सप्ताह,महावाचन उपक्रम,वाचन संकल्प पंधरवडा,विविध प्रकारचे सप्ताह साजरे करून या सर्व उपक्रमांची माहिती ऑनलाईन भरायची,फोटो अपलोड करायचे, विविध प्रकारच्या लिंकमध्ये सांख्यिकी माहिती भरायची अशा कार्यक्रम ंमध्ये पिचलेल्या राज्यभरातील शिक्षकांनी, 'आता उरलो उपक्रमापुरते' अशी खंत व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. तथापी प्रत्येक गोष्टीला उत्सवी स्वरूप देऊन त्या शिक्षकांना अध्यापनापासुन वेगळे ठेवणे शैक्षणिक दृष्ट्या खूप घातक असल्याचे प्रमोद पाटोळे यांचे म्हणणे आहे.**

### विक्रमगड पोलीस स्टेशनकडून

# बेस्ट पोलीस ऑफ द मंथ उपक्रमात सुरुवात




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

विक्रमगड:पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे मनोबल वाढवून कामकाजाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विक्रमगड पोलीस ठाणे यांचे कडून बेस्ट पोलीस ऑफ द मंथ या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. पोलीस अधिकारी व अंमलदार यांची कार्यक्षमता व कामकाजाची गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांचे मनोबल वाढवणे आवश्यक आहे . विक्रमगड पोलीस ठाणे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मनोबल वाढवून त्यांना दैनंदिन कामकाज करण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता विक्रमगड पोलीस ठाणे यांचे कडून बेस्ट पोलीस ऑफ द मंथ या नावीन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात करण्यात आलेली आहे .सदर उपक्रमांतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना कामकाजाचे निकष ठरवून देण्यात आलेले असून त्या निकषाप्रमाणे जे पोलिस अधिकारी व अंमलदार दैनंदिन कामकाज व्यवस्थित रित्या पार पाडतील अशा पोलीस अधिकारी व अंमलदार यांची गुणांकन पद्धतीने निवड करून त्यांना बेस्ट पोलीस ऑफ द मंथ या सन्मानाने पुरस्कृत करण्यात येईल.

माहे फेब्रुवारी २०२५ या महिन्यात विक्रमगड पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कामगिरीचा आढावा घेता पो. हवा. मुकुंद रडका भोगाडे यांनी सुमारे ११ महिन्यापासून फरार असलेल्या बंदी आरोपीचा अत्यंत शिताफिने शोध घेऊन त्यास पकडून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तसेच म.पो.शि . बसंता छगन लोखंडे यांनी पोलीस ठाण्यातील सीसीटीएनएस या ऑनलाइन कार्यप्रणालीचे उत्कृष्ट कामकाज केलेले आहे. नमूद दोन्ही पोलीस अंमलदार यांनी दिलेल्या निकषाप्रमाणे उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये बेस्ट पोलीस ऑफ द मंथ या सन्मानाने पुरस्कृत करण्यात आलेले आहे. तसेच यापुढे देखील पोलीस ठाणे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे दैनंदिन कामकाज व विशेष कामगिरी बाबत आढावा घेऊन त्यांची गुणांकन पद्धतीने निवड करून त्यांना बेस्ट पोलीस ऑफ द मंथ या सन्मानाने पुरस्कृत करण्यात येणार आहे .अशी माहिती विक्रमगड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी दिली.

# स्वर्गीय चंद्रकांत भोईर रिक्षा स्टँडच्या नवीन फलकाचे उदघाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण- करोना काळात बंद करण्यात आलेले कल्याण (प ) येथील रिक्षा स्टैन्ड परत सुरू होण्याचे चिन्ह दिसू लागले आहेत. शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) चे विधानसभा सह संघटक रूपेश चंद्रकांत भोईर आणि महाराष्ट्र रिक्षा- टॅक्सी सेनेचे कल्याण शहर अध्यक्ष निलेश भोर यांच्या प्रयत्नांना यश येताना दिसत आहे. ह्या रिक्षा स्टैन्डला स्वर्गीय चंद्रकांत भोईर रिक्षा स्टैन्ड नाव देऊन रविवारी गुढीपाडवा च्या दिवशी नाम फलक चा रीतसर उदघाटन करण्यात आले.




ह्या वेळी शिवसेना शहर प्रमुख सचिन दिलीप बासरे, भिवंडी लोकसभा क्षेत्र चे संपर्क प्रमुख साईनाथ तारे समवेत मोठ्या संख्येत रिक्षा चालक उपस्थित होते. कल्याण (प ) रेलवे स्टेशनच्या बाहेर फार जूना रिक्षा स्टैन्ड होता. पण करोना काळात सदरचा रिक्षा स्टैन्ड बंद करण्यात आला. त्यानंतर स्मार्ट सिटी चे कार्य सुरू झाले. त्यामुळे जवळपास तीनशे रिक्षा चालकांवर उपासमारीची वेळ आली. रिक्षा चालकांनी आपली समस्या प्रथम शिवसेना विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांच्या कडे मांडली , रूपेश भोईर यांनी महाराष्ट्र रिक्षा-टॅक्सी चालक सेनेचे जिल्हा अध्यक्ष आणि माजी महापौर रमेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रा रिक्षा-टॅक्सी सेना चे शहर अध्यक्ष निलेश भोर यांना सोबत घेऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड बरोबर चर्चा केली आणि स्मार्ट सिटी च्या नावाखाली स्टेशनच्या बाहेर ठेवलेला भंगार काढून तिथे पूर्वी असलेला रिक्षा स्टैन्ड सुरू करण्याची विनंती केली. हर्षल गायकवाड यांनी एक दोन दिवसात पाहणी करून रिक्षा स्टैन्ड सुरू करण्यास मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर रविवारी गुढीपाडवा च्या दिवशी नाम तिथे कल्याण-डोंबिवली मनपा चे प्रथम स्थायी समिति सभापति स्वर्गीय चंद्रकांत भोईर रिक्षा स्टैन्ड च्या नवीन फलकाचा लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी उपशहर प्रमुख वंडार कारभारी, विलास भोईर, पत्रकार आतिश भोईर उद्योजक निलेश गवळी, मुबारिस खान, विभाग संघटक विकास रोकडे, शाखाप्रमुख सचिन सोष्टे, मुंबई एअरपोर्ट सेक्रेटरी निलेश रुद्राक्ष, एडवोकेट समृद्ध ताडमारे, गणेश साळवे, महेश भोईर, युसुफ बाबा शेख, इरशाद शेख, प्रशांत जाधव,संदीप पंडित , अमोल सातवे, इर्शाद शेख हरषद शेख, स्टॅन्ड प्रमुख वसीम शेख ,सरचिटणीस गोपाळ नवगिरे, सेक्रेटरी विजय वझे व इतर सहकारी उपस्थित होते. या कार्यक्रमास आलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार रुपेश भोईर आणि निलेश भोर यांनी व्यक्त केले.




### महिलांना कोट्यावधीचा गंडा घालणाऱ्या

# राणीला मुरबाड पोलिसांनी ठोकल्या बेड्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड शहरातील तोंडलीकरनगर येथे एका उच्च भ्रू सोसायटीत राहणाऱ्या राणी जनार्दन देशमुख नावाच्या महिलेने शहरातील शेकडो महिलांना तब्बल 7 ते 8 कोटीला गंडवून पोबारा केला होता. महिलांच्या तक्रारी नंतर फरार असलेल्या मुरबाडच्या त्या राणीला ( बबली) अखेर मुरबाड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की मुरबाड शहरात अनेक महिलांचे महिन्याला पैसे जमा करून भिशी लावण्याचा प्रकार आहे.त्यातुन आपल्या कुटुंबाची आर्थिक बचत करण्याचा उद्देश असतो. मग ही भिशी कोणीतरी एक प्रमुख महिला चालवित असते या महिलेकडे इतर सर्व सदस्य महिला दर महिन्याला पैसे जमा करत असतात. अशाच






प्रकारे तोंडलीकरनगर येथे राहणारी रानी देशमुख सुद्धा हा व्यवसाय करायची.भिशी लागलेल्या दुसर्या महिलेचे पैसै ती तिसर्या व्यक्तीस व्याजी देत होती. गेली अनेक वर्ष " याची टोपी त्याला त्याची टोपी याला" लावुन महिलांच्या अज्ञान पणाचा फायदा घेत त्यांना बुमरंग करत होती.असे शेकडो महिलांचे लाखो रूपये तिने गोळा केले आहेत व या पैशातून तिने काही प्रापर्टी सुद्धा जमा केली असल्याचे कळते. याज बरोबर तिने अनेक नातेवाईक महिलांचे काही कोटी रुपये सोन्याचे दागिने दोन चार दिवसांच्या बोलीवर परत आणून देते असे खोटे सांगून गंडा घालून लंपास केले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## राणीचा मास्टर माईंड कोण ?

राणी देशमुख जेव्हा आपल्या राहत्या घरी दिसत नसल्याचे भिशी भरणार्या महिलांच्या लक्षात आल्यावर हा प्रकार उघडकीस आला असून मुरबाडच्या या( बबली) विरोधात मुरबाड पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती .त्यानंतर मुरबाड पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवली व काही तासांत बाहेर पळून जाण्याच्या बेतात असणार्या राणीला शोधून काढली आहे. एवढ्या मोठ्या रकमेची व शेकडो महिलांची फसवणूक एकटी राणी देशमुख करू शकत नसून तिचा बोलविता धनी (मास्टर माईंड) कोण आहे याचा तपास लावणे मुरबाड पोलिसांसमोर आव्हान असून मुरबाड पोलीस स्टेशनचे पो.नि. संदिप गिते या गंभीर घटनेचा पुढील तपास करत असून लवकरच अन्य कोण साथिदार आहेत का? याचाही शोध घेतला जाणार असल्याचे पोलीस सुत्रांनी सांगितले आहे.

*" दरम्यान फसवणूक झालेल्या सर्व महिला सामान्य कुटूंबातील असून महिला घाबरल्या आहेत.आपले गेलेले लाखो रूपये व दागिने कसे परत मिळणार या विवंचनेत या महिला असून त्या लबाड महिले कडून लवकरात लवकर वसूल करावी अशी मागणी फसवणूक झालेल्या महिलांकडून होत आहे.*



# ‘निवारा चॅरिटेबल ट्रस्ट’तर्फे जेष्ठ नागरिकांचा सत्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : निराधर, गरीब, गरजू, विधवा महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी समर्पित सेवा देणाऱ्या कल्याण पूर्वेतील निवारा चॅरिटेबल ट्रस्ट च्या प्रथम वर्धापन दिन सोहळ्यात ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांच्या हस्ते या जेष्ठ नागरिकांना सन्मानित केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नागेश बिराडे यांच्या हस्ते लिखित पुस्तकाचे वितरण करण्यात आले. या सोहळयाला भाजपाचे जेष्ठ नेते जगन्नाथ पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे व.पो.नि. गणेश न्हायदे, भाजप कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष, संस्थेचे उपाध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे आयोजक संजय मोरे, माजी परिवहन सभापती,संस्थेचे कार्याध्यक्ष सुभाष म्हस्के, सचिव संदीप तांबे, उपसचिव अरविंद शिंपी, खजिनदार उमाकांत पाटील, विश्वस्त वासुदेव घाडे, संजय शिंदे, अजय पवार, सदानंद शिंदे, कृष्णा घाटे तसेच इतर पदाधिकारी सदस्य आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

समाजाच्या हितासाठी अविरत कार्य करणाऱ्या या ट्रस्टला आमदार सुलभा गायकवाड यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत समाजसेवेसाठी कार्यरत राहावे असे आवाहन केले.

# जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : येथील बावघर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी आजूबाजूच्या आवश्यक असलेल्या झाडांना पाणी टाकून त्यांना नवसंजीवनी देऊन पर्यावरण संवर्धन जोपासण्याचा प्रयत्न करीत आहेत.

शहापूर तालुक्यातील वासिंद पासून जवळपास दहा ते बारा किमी अंतरावर असलेल्या बावघर या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेतील शिक्षिका हर्षला गोष्टे यांच्या संकल्पनेतून येथील रखरखत्या उन्हात पाण्याची नितांत आवश्यकता असणाऱ्या झाडांचा शोध घेत आणि त्या झाडांना दैनंदिन पाणी टाकून झाडांना नव्याने उभारी घेण्यास मदत केली असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक सचिन ढमणे यांनी म्हटले.

यामध्ये वड, पिंपळ, डीकामाळी, आंबा, पेरू यासारखी झाडे शोधून गावातून पाणी आणून या झाडांना पाणी घातले जाते. त्यामुळे आवश्यक असलेल्या झाडांना पाणी टाकून त्यांना नवसंजीवनी देऊन पर्यावरण संवर्धन जोपासण्याचा प्रयत्न शाळेतील शिक्षक व विद्यार्थी करीत आहेत. सदरचा उपक्रम पर्यावरण संवर्धनास आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयी आपुलकी बाळगण्यास निश्चितच मदत करेल त्यामुळे या उपक्रमाचे कौतुक करून सर्व शाळांनी असे उपक्रम राबविण्याचे आवाहन विस्तार अधिकारी हिराजी वेखंडे, केंद्रप्रमुख पी.व्ही. शिर्के यांनी केले. तर गटशिक्षणाधिकारी बी.टी. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक अध्यापन बरोबर इतर विविध उपक्रम राबविले जात आहेत. यासाठी शिक्षक -शिक्षिकेतर परिश्रम घेत असल्याचे दिसून येत आहे.

# अनाधिकृत बांधकामाची उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केली प्रत्यक्ष स्थळपाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील टीटीसी औद्योगिक क्षेत्रात मौजे शिळ, सर्व्हे नं.97/1 व 17 या एमआयडीसीचा भूखंड तसेच शीळ, खर्डी, खान कंपाऊंड, महापे रोड या ठिकाणी होत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत विधानपरिषद सदस्य धीरज लिंगाडे व निरंजन डावखरे यांनी विधानपरिषदेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली.



यावेळी विधानपरिषद सदस्य धीरज लिंगाडे, निरंजन डावखरे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळाचे कार्यकारी अभियंता आर.सी. राठोड, मुख्य अभियंता प्रकाश चव्हाण, प्रादेशिक अधिकारी महेंद्र पटेल, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, ठाणे महानगरपालिका अभियंता श्री.जोशी, तहसिलदार उमेश पाटील, नायब तहसिलदार श्री.दिनेश पैठणकर, भूमी अभिलेख तसेच वनविभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी प्रत्यक्ष संबधित टीटीसी औद्योगिक क्षेत्रात मौजे शिळ येथील सर्व्हे नं.97/1 व 97 या एमआयडीसीचा भूखंड तसेच शीळ, खर्डी, खान कंपाऊंड, महापे रोड येथील अनाधिकृत बांधकामबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमावेत चर्चा करून या संदर्भात असलेल्या तक्रारींबाबत कोणत्या कायदेशीर उपाययोजना करता येतील, याबाबत आढावा घेतला. यावेळी श्री. नाईक म्हणाले की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळ, महसूल, वन विभाग, महानगरपालिका, भूमी अभिलेख यांनी एकत्रितपणे अनधिकृत बांधकामाबाबत लवकरात लवकर प्रत्यक्ष जागेची मोजणी करुन, हद्द कायम करुन अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळाच्या जागेवर अनधिकृत बांधकाम होवू नये, असे माझे मत आहे. परंतू उद्योगाचा प्रश्न असेल तर मी त्याबाबत काही निर्णय घेवू शकतो. परंतु इतर विषयाबाबत निर्णय संबधित विभागास सोबत घेऊन घ्यावा लागेल. या संदर्भात संबधित विभागाकडून कायदेशीर अहवाल आल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल, असेही ते म्हणाले.

# अनुसूचित घटकांतील नवउद्योजकांना आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने अनुसूचीत जाती आणि नवबौध्द घटकांतील नवउद्योजकांसाठी "स्टँड अप इंडिया" ही योजना आणली असून या योजनेंतर्गत राज्यातील अनुसूचित जातीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या नवउद्योजकांना मार्जिन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्श्यामधील 25 टक्क्यामधील जास्तीत जास्त 15% मार्जिन मनी (Front End Subsidy) म्हणून उपलब्ध करुन देण्यास शासन निर्णय दि.8 मार्च 2019 नुसार मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील अनुसूचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक यांनी एकूण प्रकल्प किंमतीच्या 10% स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत 75% कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरीत 15% रक्कम Front End Subsidy म्हणून राज्य शासनामार्फत देण्यात येते.

तरी ठाणे जिल्ह्यातील पात्र इच्छुक नवउद्योजकांनी याबाबत अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे कार्यालय, 4 था माळा, सामाजिक न्याय भवन, दत्तवाडी, खारेगाव, कळवा, ठाणे पश्चिम, - 400605 येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण, ठाणे सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

# समान, सुरळीत पाणीपुरवठा हवा अन्यथा मोर्चाही काढण्याची तयारी

## - आ. डॉ. किणीकर यांचा मजीप्राला इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ: अंबरनाथमध्ये पाण्याचे असमान वाटप होत असल्याबद्दल नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. त्याची दखल घेऊन आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी झोपडपट्टी असो वा इमारत सगळीकडे समान पाणी वितरण झाले पाहिजे असे निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर हा प्रश्न मार्गी न लागल्यास प्रसंगी मोर्चा काढण्याचीही आमची तयारी आहे, असा इशाराही त्यांनी दिला आहे.



गेल्या काही दिवसांपासून अंबरनाथमध्ये अनेक भागात पाणी समस्या जाणवत आहे. त्यामुळे गेल्या महिन्याभरात अनेक माजी नगरसेवकांनी तसेच नागरिकांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात धडक देत जाब विचारला आहे. पाणी टंचाईच्या वाढत्या प्रश्नाबद्दल सर्वसामान्य नागरिकांतही असंतोष व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (ता.१) आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी अंबरनाथ येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला. एप्रिल महिन्याला सुरुवात झाली असताना शहरात काही भागात पाणीटंचाई जाणवू लागली आहे. काही भागात अनियमित तर काही भागात मुबलक पाणी पुरवठा होत असल्याने पाणी वितरण व्यवस्थेच्या कार्यपद्धती विषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे, याबद्दल आमदार किणीकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली, पाणी वितरण करणारे कर्मचारी कामचुकारपणा करत असल्यास त्यांच्यावर कारवाई करावी, मुख्य जलवाहिनीवरून पाणी घेतले असेल अश्या जोडण्या खंडित कराव्यात अशा सूचना त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.तर पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. उपलब्ध पाणी सर्वांना समान उपलब्ध करून दिले जाईल, असे आश्वासन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता मिलिंद देशपांडे यांनी दिले. याप्रसंगी श्रीनिवास वाल्मिकी,पुरषोत्तम उगले, गणेश कोतेकर, मालती पवार, सुभाष साळुंके, रवी पाटील, सुरेंद्र यादव, चंद्रकांत भोईर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगार व इंटर्नशिप मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग आणि तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.03 एप्रिल रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 02.00 या वेळेत तनिष हॉटेल अँड रिसॉर्ट, प्लॉट नं. 27, मेन रोड, हिंडाल्को कंपनी समोर, एम.आय. डी.सी. तळोजा, ता.पनवेल येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आणि मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना (Internship) उमेदवार निवड मेळावा आयोजित करण्यात आला असून जिल्ह्यातील बेरोजगारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीम.अ.मु. पवार यांनी केले आहे.

या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापनांमधील रिक्तपदांसाठी भरती केली जाणार आहे. एस.एस.सी., एच.एस.सी., आय.टी.आय., डिप्लोमा इंजिनियर, पदवीधर आणि इतर पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे संधी मिळणार आहे.

ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया: उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in संकेतस्थळावर जाऊन Employment Job Seeker या पर्यायातून लॉगिन करून शैक्षणिक माहिती अद्ययावत करावी आणि Pandit Dindayal Upadhyay Job Fair या पर्यायामधून जिल्हा निवडून ऑनलाईन अर्ज करावा.

इंटर्नशिपसाठी इच्छुक उमेदवारांनी https://cmykpy.mahaswayam.gov.in संकेतस्थळावर Intern Login द्वारे लॉगिन करून Apply for Jobs वर क्लिक करावे आणि आपला जिल्हा निवडून उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज करावा.अधिक माहितीसाठी ऑनलाईन अर्ज करताना अडचण आल्यास 02141-222029 या क्रमांकावर किंवा श्री. महेश भा. बखरे (मो. 9421613757) यांच्याशी संपर्क साधावा.

## सावरोली येथे

# ‘आई कारवा देवी’ यात्रेचे आयोजन





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : ठाणे जिल्ह्यातील देवी भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा पाच्छापुर रस्त्यावरील राहुर सांवरोली येथील प्रसिद्ध "आई कारवा देवी" यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

कारवा देवी सेवा कमिटी ट्रस्ट यांच्या वतीने गुरुवार दिंनाक ३ ते शुक्रवार दिनांक ४ एप्रिल दरम्यान निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या व कारवा डोंगराच्या कुशीत वसलेल्या राहुर सांवरोली येथील मंदीर व परिसरात ही यात्रा भरणार असुन यामध्ये देवीचा अभिषेक, पालखी सोहळा, महाआरती, जागरण, ओटी भरण, दर्शन, महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार असुन नागरीकांनी, देवी भक्तांनी त्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन कारवा देवी सेवा कमिटी ट्रस्ट व कोंशीबी सेवा सहकारी सोसायटीचे माजी सभापती व विद्यमान संचालक अरुण बाळु गोरले यांनी केले आहे.

# नूतन ज्ञानमंदिर शाळेत पुस्तकांची गुढी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : नूतन ज्ञान मंदिर कल्याण पूर्व शाळेत सांस्कृतिक समिती व मराठी वाङ्मय मंडळ यांनी पुस्तकांची गुढी उभारून गुढीपाडवा साजरा करण्यात आला. नूतन ज्ञानमंदिर शाळेमध्ये पारंपारिक गुढी उभारून त्या मागचे वैज्ञानिक तसेच पारंपारिक कथा सांगून विद्यार्थ्यांना गुढीपाडव्याचे महत्त्व पटवून दिले.

याच दिवशी शाळेमध्ये वाचनाची संस्कृती वाढीस लागावी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी पुस्तकाची ही गुढी उभारली. शाळेतल्या विद्यार्थ्यांनी वाचनाचा संकल्प गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर केला. या दिवशी पुस्तक परीक्षणाचे स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांनी आपण वाचलेल्या पुस्तका विषयी माहिती सांगितली व एक निकोप स्पर्धा पार पडली. या उत्सवात सांस्कृतिक समितीच्या मोटघरे, शाळेच्या मुख्याध्यापिका गागरे व शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा सहभाग होता. मराठी माध्यमाच्या शाळा मराठी रूढी परंपरा आणि संस्कृती जोपासण्याचे काम जोमाने करत आहेत.




# केडीएमसीला पुर्ण कार्यकाळासाठी आयुक्त द्या

## राजू पाटील यांचा सवाल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांची १५ महिन्यांमध्येच पालघर जिल्हाधिकारी म्हणून बदली झाली आहे. यावरूनच आता मनसे नेते राजू पाटील यांनी सवाल उपस्थित केला आहे.

राजू पाटील यांनी एक्स पोस्ट द्वारे सांगितले की आयुक्त चांगल काम करत होत्या. आता कुठेतरी अनधिकृत बांधकामांवर अंकुश येत असताना, त्या अनधिकृत बांधकामांच्या नावाने सत्ताधाऱ्यांच्या हस्तकांकडून होतं असलेल्या वसूलीच्या आड त्या येत होत्या का ? आमच्या या शहरांना पुर्ण कार्यकाळासाठी ( ३ वर्ष ) आयुक्त कधीतरी मिळणार आहे का? असा सवाल पाटील यांनी केला आहे.

# माजी आ.गणपत गायकवाड यांना कल्याण कोर्टात केलं हजर



**२०१४ साली पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या वादा प्रकरणाची होती सुनावणी**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वचे माजी आमदार गणपत गायकवाड यांना एका जुन्या वादातून कल्याण कोर्टात हजर केलं होत. 2014 साली कोळसेवाडी पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या वादाप्रकरणी गणपत गायकवाड यांना कल्याण कोर्टात हजर करण्यात आलं होतं. तब्बलअडीच तास सुनावणीनंतर या प्रकरणी गणपत गायकवाड यांना क्लीन चिट मिळाल्याचे सांगण्यात आले. गणपत गायकवाड हे हिल लाईन पोलीस स्टेशन मध्ये गोळीबार प्रकरणी सध्या जेलमध्ये आहेत. जेल मधूनच गणपत गायकवाड यांना 2014 च्या जुन्या प्रकरणात कोर्टात आणण्यात आलं होतं.

२०१४-साली पोलिस स्टेशनमध्ये झालेल्या एका राडा प्रकरणात भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांचा कल्याण न्यायालयात जबाब नोंदविला गेला. पोलिसांनी दाखल केलेला गुन्हा गायकवाड व शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे यांनी नकारला आहे. केबलच्या वादातून गणपत गायकवाड व निलेश शिंदे यांच्यात वाद झाल्याचा गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी चोरी आणि सोनसाखळी चोरीच्या वाढत्या गुन्ह्याबाबत आम्ही पोलिसांना भेटण्याकरीता गेले होतो. असा काही प्रकार घडला नाही,असे दोन्ही पक्षाने न्यायालयासमोर सांगितले आहे. या प्रकरणात गायकवाड यांनी जबाब नोंदविला आहे तर माजी नगरसेवक निलेश शिंदे यांनी सत्यप्रतिज्ञा पत्र दिले आहे. आज कल्याण न्यायालयात गायकवाड यांना आणले असता यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. यावेळी त्यांना पुन्हा कारागृहात घेऊन जात असताना त्यांच्या समर्थकांनी प्रचंड गर्दी केली.




‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024